## प्रमाणपत्र

प्रणिता प्रकाश पाटील ही शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र विभागाची एम्.फिल. २००७-०८ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थिनी आहे. त्यांनी एम्. फिल. च्या अभ्यासक्रमाचा अविभाज्य भाग म्हणून 'दैनिक ॲग्रोवन' मधील दूधव्यवसायाचे स्थान (जाने.२००७ ते डिसें.२००७) हा विषय लघुप्रबंधासाठी निवडला आहे. त्यांनी हा लघुप्रबंध डॉ. रत्नाकर पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. त्यांच्या लघुप्रबंधास विभागाची मान्यता आहे.

दिनांक - 27. 4. 2009

ठिकाण - कोल्हापूर.

27.4.9

डॉ. ओमप्रकाश कलमे

विभागप्रमुख

वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र विभाग,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

Reader & Head,
Department of Journalism &
Communication Science
Shivaji University,
KOLHAPUR-416004

## प्रमाणपत्र

कु. प्रणिता प्रकाश पाटील यांनी शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र विभागाच्या एम्. फिल. २००७-०८ या वर्षासाठी निवडलेल्या ''दैनिक ॲग्रोवन' मधील दूधव्यवसायाचे स्थान (जाने.२००७ ते डिसें.२००७)'' हा लघुप्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. हा लघुप्रबंध कोणत्याही विद्यापीठातील अन्य परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक -

ठिकाण- कोल्हापूर

मार्गदर्शक

डॉ. रत्नाकर पंडित

# प्रमाणपत्र

मी प्रणिता प्रकाश पाटील, प्रतिज्ञापुर्वक जाहिर करते की, शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल. या पदव्युत्तर अभ्यासक्रमाचा अनिवार्य भाग म्हणून सादर केलेला ''दैनिक ॲग्रोवनमधील दूधव्यवसायाचे स्थान (जाने. २००७ ते डिसें. २००७) या विषयावरील लघुप्रबंध पूर्णपणे स्वत: लिहिला आहे. हा लघुप्रबंध कोणत्याही विद्यापीठातील अन्य परिक्षेसाठी सादर केलेला नाही.

Patil

प्रणिता प्रकाश पाटील

वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र विभाग,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

Department of Journalism & Communication Science. Shivaji University, KOLHAPUR-416004

# मनोगत

भारत हा कृषीप्रधान देश आहे. बहुसंख्य लोकसंख्येचे अस्तित्व हे शेती या मुख्य व्यवसायावरच अवलंबून आहे. या कृषीक्षेत्राच्या परिपूर्ण विकासावर आज देशाचा सर्वांगिण विकास आधारित आहे. शेतकरी आणि शेती यांची विषेश दखल घेणे गरजेचे आहे हे ओळखून भारतातील मुद्रित माध्यमे कार्यरत झाली आहेत. पीके, हवामान, बाजार दर, शेतीतील नवे प्रयोग, समस्या, अडचणी त्यावरील उपाय याबाबत योग्य मार्गदर्शन शेतकऱ्यांना मिळणे गरजेचे आहे. आजही वृत्तपत्रे जनमाणसांवर प्रभाव पाडणारी असून विश्वासार्हता उल्लेखनिय आहे. माहितीच्या इतर साधनांच्या तुलनेत वृत्तपत्रे स्वस्त असतात. सकाळ वृत्तपत्र समूहाने बदलत्या काळाची पाऊले ओळखून 'दैनिक ॲग्रोवन' हे कृषीदैनिक सुरु केले आहे ही कौतुकास्पद बाब आहे. त्यामुळे कृषी पत्रकारिता महत्वाची ठरली आहे. तसेच त्याची व्याप्ती वाढली आहे.

भारतात शेतीचा विकास होतांना त्याला पूरक नव्या व्यवसायाला सुरुवात झाली. त्यापैकी दूध व्यवसाय हा एक होय. धवलक्रांती आणि सहकार चळवळीच्या माध्यमातून आज महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनाचा दूधव्यवसाय हा अविभाज्य घटक बनला आहे. पर्यावरणावर अवलंबून असणारी शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या घरात दूधव्यवसायामुळे सधनता येत आहे. ग्रामीण जिल्हा पातळीवरचे अर्थकारण आणि राजकारण आज दूधव्यवसायाभोवती फिरताना दिसते. या व्यवसायासंबंधी जास्तीत जास्त माहिती मिळून शेतकरी वर्ग स्वावलंबी होणे गरजेचे आहे. कृषीदैनिक असणाऱ्या 'दैनिक ॲग्रोवन' मध्ये या व्यवसायासंबंधी बातम्या प्रकाशित होतात. त्या अनुषंगाने 'दैनिक ॲग्रोवनमधील दूध व्यवसायाचे स्थान' या विषयावर संशोधन करण्याची संधी मिळाली.

संशोधन योग्य पध्दतीने होण्यासाठी माझे मार्गदर्शक डॉ. रत्नाकर पंडित, विभागप्रमुख ओमप्रकाश कलमे आणि विभाग कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे मला मोलाचे सहकार्य मिळाले. मी त्यांची ऋणी आहे.

प्रणिता प्रकाश पाटील.